श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

| वर्ष-८, अंक-१२ विशेषांक | डिसेंबर-२०२० | विनामूल्य खासगी वितरणासाठी | मासिक, पाने २० |

## ख्यातनाम संशोधक डॉ. ऋता मुल्हेरकर यांचा हृद्य सत्कार

श्रीसदुरू बाबामहाराज सहस्रबुद्धे यांच्या १३७ व्या जयंती उत्सवानिमित्ताने श्रीबाबामहाराज सहस्रबुद्धे समाधिमंदिरात दि. १ डिसेंबर २०२० रोजी सायंकाळी ५.३० वाजता श्रीसदुरू वासुदेवानंतसरस्वती सेवामंडळातर्फे ख्यातनाम संशोधक डॉ. ऋता मुल्हेरकर यांचा, 'पेशी आणि आण्विक जीवशास्त्र, जैव तंत्रज्ञान आणि जनुकीय उपचारपद्धती'च्या – Cell and Molecular Biology (Cancer), Biotechnology, Gene Therapy – क्षेत्रातील त्यांच्या महत्त्वपूर्ण कामगिरीबद्दल भव्य सत्कार करण्यात आला.

श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टचे कार्यकारी विश्वस्त श्री. विकासराव वालावलकर यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, मानपत्र आणि रु. एक लक्ष देऊन करण्यात आलेल्या या सत्काराचा प्रारंभ वैदिक शांतिसूक्त पठणाने झाल्यावर डेरवण येथील 'भ.क.ल. वालावलकर रुरल मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटल'च्या वैद्यकीय संचालिका डॉ. सुवर्णा पाटील यांनी समारंभाचे सूत्र संचालन करताना या सत्काराची पार्श्वभूमी सांगून डॉ. मुल्हेरकर यांचा परिचय करून दिला.




*डॉ. ऋता मुल्हेरकर यांचा सत्कार करताना श्री. विकासराव वालावलकर, डावीकडे – डॉ. बाणावली*




*डॉ. सुवर्णा पाटील, समारंभाच्या सूत्रसंचालिका*

''प.पू. बाबामहाराजांच्या जयंतीनिमित्त प्रतिवर्षी होणारा विद्वज्जनांच्या सत्काराचा कार्यक्रम आज होत आहे. बाबामहाराज स्वतः विद्वान तर होतेच पण त्यांची अध्यात्मातही उच्चकोटीची पदवी होती. ते बहुगुणी व बहुआयामी होते. बाबामहाराज व्यावहारिकदृष्ट्या इंजिनीअर तर होतेच पण त्याचबरोबर ते अंतर्ज्ञानी व अंतर्साक्षी होते. अशा श्रीसद्गुरू बाबामहाराजांच्या जयंतीचे औचित्य साधून सामाजिक, शैक्षणिक, वैद्यकीय तसेच शास्त्रीय संशोधन अशा क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी केलेल्या विद्वानांचा सत्कार संस्थेने करणे हे अत्यंत उचित आहे.''

''नाभिषेको न संस्कार: सिंहस्य क्रियेत वने । विक्रमार्जित सत्वस्य स्वयमेव मृगेंद्रता ।।'' हे सुभाषित सांगून डॉ. पाटील म्हणाल्या की ज्याप्रमाणे सिंह हा आपल्या अंगभूत गुणांमुळे जंगलचा राजा समजला जातो, त्यासाठी त्याला राज्याभिषेक करून घ्यावा लागत नाही; त्याप्रमाणेच आजच्या सत्कारमूर्ती डॉ. ऋता मुल्हेरकर या आपल्या अंगभूत गुणांमुळेच मायक्रोबायोलॉजी क्षेत्रातील एक अग्रगण्य शास्त्रज्ञ म्हणून संबोधल्या जातात. Cell culture PCR, GEL/ DNA electrophoresis, Agarose electrophoresis,Protein purification अशा क्लिष्ट विषयात त्यांनी प्रामुख्याने काम केलेले आहे.

ह्याचे बाळकडू त्यांना त्यांच्या आजीकडून मिळाले आहे किंबहुना त्यांच्या गुणसूत्रातूनच ते त्यांना मिळाले. त्यांच्या आजी डॉ. लीला मुल्हेरकर ह्या १९५०च्या दशकात Edinburgh University मधून Zoology चे उच्च शिक्षण घेऊन भारतात परतल्या आणि अध्यापन करू लागल्या. अतिशय कडक स्वभावाच्या व शिस्तप्रिय पण उत्कृष्ट शिक्षिका अशा या आजी एम.एस्सी. साठी पुणे युनिव्हर्सिटीत डॉ. ऋता मुल्हेरकर यांच्या मार्गदर्शक झाल्या. हा तर त्यांच्यासाठी दुग्धशर्करा योग होता. नागरी वैमानिक म्हणून भारतात विमानोड्डाणाचा परवाना मिळालेल्या पहिल्या काही महिलांमधील एक असलेल्या आईकडून व Aeronotic Engineer वडिलांकडून त्यांना धाडसाचे, चिकाटीचे आणि स्पष्टवक्तेपणाचे धडे मिळाले आहेत .

त्यांनी १९८१ साली कोलकाता विश्वविद्यालयातून प्राणिशास्त्रातील (Zoology) पीएच.डी. पदवी संपादन केली आहे. 'प्रो. के. पी. भार्गव स्मृती' पदक आणि 'डॉ. व्ही. बी. कामत' पारितोषिकाच्या त्या मानकरी आहेत. त्या अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संघटनांमध्ये सदस्य म्हणून कार्यरत आहे. BIRAC, DBT, ACTREC, Homi Bhabha National Institute, ICMR अशा संस्थांमध्ये त्यांनी उच्च पदे भूषविली आहेत. ह्या सर्व संस्था संशोधनाकरिता निधी उपलब्ध करून देणे तसेच शास्त्रज्ञांना संशोधनाकरिता प्रवृत्त करणे या क्षेत्रात कार्यरत आहेत. त्याचबरोबर त्या अनेक शास्त्रीय नियतकालिकांच्या संपादकीय मंडळांच्या सदस्य आहेत. Human gene therapy, Journal of Bioscience, Journal of biotechnology या नियतकालिकांच्या त्या विद्यमान संपादिका आहेत. "India Association for Cancer Research" आणि "Indian society for Cell Biology" च्या प्रेसिडेंट आहेत. 'भ.क.ल. वालावलकर रुरल मेडिकल कॉलेज'च्या शास्त्रीय सल्लागार समितीच्या (Scientific Advisory Committee) त्या सदस्य असून त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ आपल्या मेडिकल कॉलेजला होत आहे. "Dervan Cohort" च्या 'प्रकल्प आढावा समिती'च्या (Project Review Committee) त्या अध्यक्षा आहेत.

श्रीमहाराजांच्या संस्थेशी त्यांचा परिचय हा डॉ. बाणवलींमुळे झाला. जेव्हा मेडिकल कॉलेजच्या शास्त्रीय सल्लागार समितीवर डॉ. अनिल काकोडकरांनी चेअरमन म्हणून मान्यता दिली, तेव्हाच डॉ. बाणवलीसरांनी ऋता मुल्हेरकर नामक हिऱ्याला श्रीमहाराजांच्या खजिन्यात स्थानापन्न होण्याचे निमंत्रण दिले आणि त्यांनी ते स्वीकारले. त्यानंतर शास्त्रीय सल्लागार समितीच्या अनेक सभांमध्ये चर्चिल्या गेलेल्या डॉ. नाडकर्णीसरांच्या संशोधनाकडे त्या सहजगत्या आकर्षित झाल्या; कारण तो विषय त्यांच्याही अत्यंत आवडीचा होता.

एकदा डॉ. नाडकर्णी यांनी त्यांना रात्री उशीरा फोन करून मणक्यातून काढलेल्या पेशींच्या वाढीची माहिती दिली. मॅडमनी रात्रीत सर्व वाचन करून या संदर्भात भरपूर माहिती संकलित केली व तिथूनच नवनवीन शोधांची एक शृंखला सुरू झाली. "Foetal Bovina Serum' नावाचे एक महागडे द्रव्य सर्व संशोधक संशोधनाकरिता वापरतात. आपल्या लॅबमधील प्रयोगाअंती मॅडमना व नाडकर्णीसरांना असे जाणवले की टाकून दिलेल्या प्लेटलेट्स




*श्री. विकासराव वालावलकर यांचे मनोगत – ''एवढ्या मोठ्या व्यक्तिमत्त्वाचा सत्कार करायला मिळणे हा आपल्या संस्थेचाही सन्मान आहे.''*

(platelets) पासून अत्यल्प किंमतीत ते द्रव्य उपलब्ध करता येईल व त्यासाठी आता संशोधन सुरू आहे व ते लवकरच यशस्वी होईल याची खात्री आहे. शास्त्रज्ञ म्हणून ३६० अंशामधून विचार केल्याशिवाय कोणत्याही गोष्टींवर त्या विश्वास ठेवत नाहीत पण जेव्हा त्या विश्वास ठेवतात तेव्हा ती गोष्ट ११०% बरोबरच असते.

''तीन दशकापूर्वी त्यांनी Antibody तयार करण्याचे तंत्र भारतात प्रथमच विकसित केले. आपल्या शरीरातील Protein Factory मध्ये gene incorporate करण्याचे तंत्र विकसित करून आपल्या देशात मोठ्या प्रमाणात Antibodies तयार करण्याचा त्यांचा मानस होता; त्यामुळे आज आपल्याला Antibodies साठी इतर राष्ट्रांवर अवलंबून राहावे लागते ते आपल्याकडेच तयार झाले असते. पण काही कारणास्तव ते घडू शकले नाही. पण आता श्रीबाबा महाराजांच्या आशीर्वादामुळे कदाचित मॅडमना ते डेरवणमध्ये करणे शक्य होणार आहे.''

''२०१३ साली त्या 'मुव्हिंग ॲकॅडमी ऑफ मेडिसिन ॲन्ड बायोमेडिसिन'' (Moving Academy of Medicine and Bio medicine) च्या सदस्या झाल्या. खेड्यातल्या व धनगर आदी भटक्या समाजातील मुलांना संशोधनाची गोडी लागावी म्हणून डॉ. माधव देवांनी स्थापना केलेल्या या संस्थेत त्या सहभागी झाल्या. बालपणातच विद्यार्थ्यांमध्ये संशोधन संस्कृती निर्माण करण्याकरिता त्यांना वेगवेगळे प्रयोग फिरत्या प्रयोगशाळेमार्फत शिकवले गेले. त्यात मुलांना DNA extraction, Genomics अशा विषयांचे ज्ञान दिले जाते आणि आता ही सर्व प्रयोगशाळा डॉ. माधव देव व डॉ. ऋता यांनी 'भ.क.ल. वालावलकर रुरल मेडिकल कॉलेज'ला प्रदान केली आहे व वैद्यकीय विद्यार्थ्यांना संशोधनासाठी प्रवृत्त करण्याचे काम करीत आहेत. श्रीकाकामहाराजांचे नोबेल मिळविण्याचे स्वप्न यामुळे नक्कीच साध्य होईल. आणि म्हणूनच अशा फारशा प्रसिद्धीच्या झोतात नसलेल्या पण मोलाची कामगिरी करणाऱ्या विद्वानांचा सन्मान करण्याच्या संस्थेच्या प्रथेनुसार आज आपण डॉ. ऋता मुल्हेरकर यांचा सत्कार करणार आहोत.''

संस्थेचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त श्री. विकासराव वालावलकर आपले विचार व्यक्त करताना म्हणाले, ''आपली संस्था सामाजिक, शैक्षणिक, वैद्यकीय तसेच शास्त्रीय संशोधन अशा क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी केलेल्या विद्वानांचा प्रतिवर्षी श्रीबाबांच्या जयंतीनिमित्ताने सत्कार करीत आली आहे. किंबहुना समाजाच्या हितासाठी ज्या संस्था स्थापन झाल्या आहेत आणि समाजासाठी कार्य करीत आहेत अशा संस्थांनी पुढाकार घेऊन, अशा विविध क्षेत्रात उत्तुंग कामगिरी करणाऱ्या विविध क्षेत्रातील व्यक्तींचा सत्कार करून त्यांना समाजासमोर आणणे हा त्या संस्थांच्या कार्याचा एक अविभाज्य भाग झाला पाहिजे. अशा व्यक्ती, विशेषत: विज्ञान, वैद्यकी आदी क्षेत्रातील व्यक्ती या नम्र आणि प्रसिद्धीपराङ्मुख असतात. त्या आपल्या कार्यातच मग्न असतात आणि त्यामुळे त्यांचे कार्य समाजापुढे येत नाही. त्यामुळे त्यांच्या कार्याची ओळख समाजाला करून देणे ही आपल्या ट्रस्टसारख्या संस्थांची नैतिक जबाबदारी आहे. अशा व्यक्ती समाजासमोर आल्यामुळे इतरांना त्यापासून स्फूर्ती मिळते.''

''आज कोणाचे आदर्श समाजापुढे ठेवायचे हाच मोठा प्रश्न आहे! इतिहासात छत्रपती शिवाजी महाराजांसारखे थोर राज्यकर्ते होऊन गेले. स्वातंत्र्यपूर्व काळात लो. टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर, नेताजी सुभाषचंद्र बोस असे महान क्रांतिवीर होऊन गेले. स्वातंत्र्योत्तर काळातही काही महान पुढारी, उत्कृष्ट साहित्यिक, संगीतकार आदी होऊन गेले. मात्र सध्याच्या काळात अशा उत्तुंग व्यक्तिमत्त्वांची वानवा जाणवते. ती नाहीत असे मी म्हणणार नाही, मात्र ती आपल्याला ज्ञात नसतात कारण ती समाजापुढे येत नाहीत हे खरे आहे. येतात ते 'डान्सिंग आयडॉल' नाहीतर 'सिंगिंग आयडॉल'! आणि बालवयातील मुलांना त्यातच अधिक रुची वाटते. अर्थातच पूर्वीच्या काळातील महान व्यक्तिमत्त्वांचा आदर्श आजही आपण ठेऊ शकतो, पण आजच्या काळाला अनुसरून कोणते आदर्श निवडायचे हा प्रश्न राहतोच. कारण आता काळ बदलला आहे. विज्ञान आणि वैद्यकीय क्षेत्रात अनेक नवीन नवीन बदल झाले आहेत. नवीन नवीन दालने उघडली आहेत, नवी क्षेत्रे उपलब्ध झाली आहेत. अशा क्षेत्रात ज्यांनी वर्तमानात भरीव कामगिरी केली आहे त्यांची ओळख समाजाला व्हायला हवी आणि त्यांचे कार्य समाजासमोर दीपस्तंभासारखे मार्गदर्शक बनले पाहिजे. तरच पुढची पिढी त्यापासून प्रेरणा घेईल आणि भविष्यात मोठे डॉक्टर्स किंवा शास्त्रज्ञ निर्माण होतील. गेल्या शंभर वर्षात नोबेल पारितोषिक




*डॉ. नाडकर्णी - ''आपण सर्व जण वैज्ञानिक शोधांमुळे सुखप्राय जीवन जगतो व या ज्ञानाला उपजीविकेचे साधन बनवितो.''*

मिळवणारे किती भारतीय आहेत? एक नाही तर दोन ! डॉ. सी. व्ही. रामन आणि डॉ. खुराना. मग आपण काय करतो की भारतीय वंशाच्या शास्त्रज्ञांना परदेशात त्यांनी केलेल्या कामगिरीबद्दल सन्मान मिळाला की आपण खूश होतो. १३० कोटींच्या देशासाठी ही नक्कीच भूषणावह स्थिती नाही. सध्या सरकार या दृष्टीने प्रयत्न करीत आहे. मंगळावर पाठविलेल्या यानाला जरी शंभर टक्के यश मिळाले नाही तरी सर्व भारतीयांना स्फूर्ती मात्र निश्चित मिळाली. मंगळायन किंवा पोखरण अणूस्फोट या विषयांवर आलेल्या चांगल्या चित्रपटांमुळे हे चांगले कार्य लोकांसमोर आले. आणि या पार्श्वभूमीवर आपला ट्रस्ट असे सत्कार करीत आला आहे आणि ते आपले कर्तव्य आहे हे प्रत्येकाने लक्षात ठेवले पाहिजे.

''आजच्या सत्कारमूर्ती डॉ. ऋता मुल्हेरकर यांची आणि आमची ओळख अगदी अलीकडची आहे. डेरवणला आपल्या संस्थेत काही 'क्लिनिकल रिसर्च' व्हावा, काही 'लॅब रिसर्च' व्हावा आणि त्यासाठी तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन लाभावे आणि त्यासाठी एक समिती स्थापावी अशी कल्पना श्रीकाकांनी मांडली. अशा सर्व मोठ्या कल्पना तेच मांडतात! त्यासाठी मग डॉ. काकोडकरांना भेटून अध्यक्ष म्हणून काम करण्यासाठी त्यांची संमती मिळविली. आणखी कोण कोण सदस्य असावेत याचा विचार सुरू असताना डॉ. बाणावली यांनी डॉ. मुल्हेरकरांचे नाव सुचविले. त्यांनीही मोठ्या मनाने आमच्या विनंतीला मान दिला. खरेतर त्या एवढ्या समित्यांच्या कामामध्ये गुंतलेल्या आहेत की त्यांनी आपल्याला होकार देणे आपल्यासाठी अभिमानास्पद आहे असेच म्हटले पाहिजे! एवढ्या मोठ्या व्यक्तिमत्त्वाला आपल्या संस्थेशी जोडण्याचे सगळे श्रेय डॉ. बाणावलींना आहे आणि त्याबद्दल संस्था त्यांची खरोखरच अत्यंत आभारी आहे. 'सॅक' (सायंटिफिक ॲडव्हायझरी कमिटी) मध्ये समावेश झाल्यावरदेखील त्यांची भेट केवळ कमिटीच्या कामकाजाच्या निमित्ताने व्हायची.

''पुढे असे झाले की आपल्या डॉ. नाडकर्णींना नवनवीन कल्पनांवर संशोधन करण्याची आवड आहे. त्यासाठी ते आपला दैनंदिन व्याप संपला की रात्री दोन, दोन वाजेपर्यंत विविध विषयांवर वाचन, संशोधन करीत असतात आणि दुसऱ्या दिवशी त्याच्यावर चर्चा करीत असतात. त्यांनी 'स्लिप-डिस्क'चे ऑपरेशन करताना त्याच रुग्णाच्या रक्तातील प्लेटलेट्स वापरण्याचा एक नवा प्रयोग केला. तो चांगला यशस्वी झाला. आणि मग रुग्णाच्या पेशी बाहेर काढून त्या वाढवून पुन्हा रुग्णाच्या मणक्यात त्याचे रोपण केले तर ते रुग्णाला अतिशय फायदेशीर ठरेल या दृष्टीने संशोधन करायचे त्यांनी ठरवले. त्यासाठी 'टिश्यू-कल्चर लॅब' उभारण्याची गरज होती. अशी लॅब उभारण्यासाठी आणि ती चालविण्यासाठी डॉ. मुल्हेरकरांशिवाय अन्य कोणी सुयोग्य व्यक्ती मिळणे शक्य नव्हते. त्या संदर्भातच मग आमचा जास्त संबंध आला.

''मॅडम पुण्यात लॅब चालवीत होत्या, तेथे त्या संशोधनही करीत होत्या आणि होतकरू तरुण संशोधकांना मार्गदर्शनही करीत होत्या. ती त्यांची सगळी ॲक्टिव्हिटी त्यांनी इन्स्ट्रुमेंट्ससह डेरवणला आणली. काही इन्स्ट्रुमेंट्स स्वत: खरेदी करून दिली आणि 'मॉलिक्युलर बायॉलॉजी लॅब' सुरू करून दिली ('टिश्यू-कल्चर लॅब' ही आणखी वेगळी आहे.); याबद्दल मी त्यांना मन:पूर्वक धन्यवाद देतो. एक एक आठवडा डेरवणला राहून प्रयोगशाळेतील संशोधनाचे कार्य त्या करीत असतात. पुणे आणि डेरवण अशा दोन्ही ठिकाणी त्या संशोधनावर भर देत आहेत. "Dervan ideation group" असा एक ग्रूप त्यांनी फॉर्म केला आहे. मलाही त्यात त्यांनी घेतला आहे. अर्थात मला त्यातले फारसे काही कळत नाही. पण काय चालले आहे ते अवगत व्हावे म्हणून मला त्यांनी ग्रूपमध्ये घेतले आहे. त्यामुळे तेथे काय प्रगती होत आहे ते मला समजते. मला फार कळते असे नाही. पण कार्याची दिशा कळते आणि आता गोडीही उत्पन्न होत आहे. तसेच ते काम किती कठीण आहे याची जाणीव होते.

''मध्यंतरी, आपल्या हॉस्पिटलमध्ये सुरू असलेल्या रिसर्च-प्रोजेक्टसाठी दिल्लीला BIRAC, ICMR अशा संस्थांमध्ये जावे लागले. अशा संस्था थोडीफार आर्थिक मदतही देत असतात. मात्र आर्थिक मदतीहून महत्त्वाची गोष्ट म्हणजे अशी मदत मिळणे याचा अर्थ आपल्या संशोधनाला एक प्रकारे मान्यता मिळणे असा होतो आणि तो आर्थिक मदतीपेक्षा अधिक महत्त्वाचा असतो. तेथे माझ्या लक्षात आले की मुल्हेरकर मॅडमचे नाव तेथे सगळ्यांनाच माहीत आहे आणि आदरणीय आहे. त्यांचे मोठेपण मला तेथे प्रकर्षाने जाणवले. आपण त्या क्षेत्रात नसल्यामुळे आपणाला त्याची जाणीव नसते. पुढे मला डॉ. नाडकर्णींकडून समजले की मॉलिक्युलर बायॉलॉजी, जेनेटिक इंजिनीअरिंग या त्यांच्या क्षेत्रात देशभरात जे संशोधन होते त्याचे मूल्यमापन करणाऱ्या कमिटीवर त्या 'ॲसेसर'

आहेत आणि त्या संशोधनाला मान्यता द्यायची अथवा नाही हे त्या, त्या संशोधनाचा अभ्यास करून ठरवतात. आणि बऱ्याच वेळा ते सादर करणाऱ्याची भंबेरी उडते कारण त्या अतिशय 'पर्फेक्शनिस्ट' आहेत. ॲसेसर म्हणून काम करणाऱ्या मॅडम डेरवण येथील संशोधन सादर करताना मात्र संस्थेवरील प्रेमापोटी आपली भूमिका बदलून अर्जदार म्हणून टेबलाच्या दुसऱ्या बाजूला बसून ते संशोधन ॲसेसमेंटसाठी सादर करतात.

'व्हाट्सॲप'वरील त्यांच्या पोस्ट पाहून त्यांचा संशोधनातील काटेकोरपणा, पर्फेक्शनिस्ट स्वभाव, ३६० अंशातून पाहून, विचार करून पुढे जाण्याची त्यांची पद्धत, संयम, डिटेल्सवर भर देण्याचा त्यांचा स्वभाव अचूकपणासाठीची त्यांची तळमळ यासारख्या त्यांच्या विशेष गुणांची जाणीव झाली. ज्यांना भविष्यात शास्त्रज्ञ बनायचे आहे त्यांनी हे गूण आत्मसात करणे अत्यंत जरुरीचे आहे. एवढ्या मोठ्या व्यक्तिमत्त्वाचा सत्कार करायला मिळणे हा आपल्या संस्थेचाही सन्मान आहे. त्यांच्या संशोधन कार्यात त्यांना उत्तरोत्तर अधिक यश मिळावे आणि त्यांचे नाव संपूर्ण जगात व्हावे अशा शुभेच्छा व्यक्त करतो आणि ते तसे व्हावे अशी श्रीमहाराजांच्या चरणी प्रार्थना करतो.''

यानंतर डॉ. नाडकर्णी यांनी आपले विचार व्यक्त केले. ते म्हणाले, ''डॉ. मुल्हेरकर या सन्मानित शास्त्रज्ञ असून त्यांचे डेरवण येथे महत्त्वाचे काम सुरू आहे. आपण सर्व जण वैज्ञानिक शोधांमुळे सुखप्राय जीवन जगतो व या ज्ञानाला उपजीविकेचे साधन बनवितो. जसे, मी सर्जन असून माझे कौशल्य मी उपजीविकेसाठी वापरतो. डॉ. मुल्हेरकर यांच्या ज्ञान आणि कौशल्याचा आढावा घेण्यासाठी मला जो वैयक्तिक अनुभव आला त्याविषयी बोलणार आहे. त्यातून त्यांची थोडेशी ओळख होईल आणि त्यांचे वेगळेपण समजेल असे मी समजतो.

''जगातील ९० टक्के मणक्यांची ऑपरेशन्स ही सरकलेल्या चकतीची असतात. चकती सरकत नाही तर ती फाटते आणि आतला भाग बाहेर येतो. या चकत्या काढल्या जातात आणि त्या फेकून दिल्या जातात. टायर पंक्चर झाला तर पंक्चर काढून आपण पुन्हा हवा भरतो. पण आपण या चकत्यांमधे काही भरत नाही. आपल्या शरीरात 'प्लेटलेट्स' नावाचा जो घटक असतो त्यात जखम भरण्यासाठी जे 'प्रोटिन्स' आवश्यक असतात ते परमेश्वरी योजनेप्रमाणे भरलेले असतात. कधी जखम झाली तर प्लेटलेट्स तेथे जमतात आणि ती जखम भरून येते. या दृष्टीने २०१३ मध्ये, आम्ही त्याच पेशंटचे प्लेटलेट्स त्या ठिकाणी प्रक्रिया करून घालायला लागलो आणि पेशंटचे दुखणे लवकर बरे व्हायला लागले आहे हे लक्षात आले आणि आम्ही ते मांडले. ते नेमके कशामुळे बरे होते हे पाहायला आम्ही National Centre for Cell Science या डॉ. मोहन वाणी यांच्या लॅबमध्ये तपासले; तेव्हा असे आढळले




*डॉ. बाणावली – 'सॅक' स्थापन करताना महाराजांच्या कृपेने पहिले नाव माझ्या डोक्यात आले ते मुल्हेरकरांचे आणि ते त्यांच्या गुणांमुळे!''*

की प्लेटलेट्स वापरले तर या टाकाऊ चकतीतील पेशी चांगल्या तऱ्हेने वाढतात. इतके दिवस मॉलिक्युलर बायॉलॉजी, डी.एन.ए., जीन्स या विषयांना आम्ही घाबरून असायचो. डॉ. मुल्हेरकर या 'सॅक'च्या मेंबर आहेत. अतिशय विद्वान आहेत. त्यांच्याशी थोडे अंतर ठेवूनच आम्ही राहात होतो. पण हे आढळल्यावर या विषयात पुढे संशोधन करायचे तर त्यांच्याशिवाय अन्य कोणी योग्य नाही हे लक्षात आले. आणि त्यांनी प्रोत्साहन दिल्यामुळे आपल्याला 'बायरॅक'चा प्रोजेक्ट मिळाला. त्यामुळे आपण डेरवणला 'टिश्यू कल्चर' म्हणजे शरीराबाहेर पेशींची शेती करू लागलो आहोत. त्याला एक विशिष्ट लॅबोरेटरी लागते. तो अतिशय क्लिष्ट विषय आहे. पण ते डॉ. मुल्हेरकरांनी सहजपणे करून दाखविले. या तऱ्हेने या पेशी वाढविण्याचे काम भारतात अन्यत्र कोठे होत असेल असे मला वाटत नाही. जगातही फारच थोड्या ठिकाणी मणक्यातील चकतीतील पेशी 'टिश्यू कल्चर'ने वाढविल्या जात आहेत.

''या पेशी अत्यंत महत्त्वाच्या असतात. कारण आपली जेव्हा वाढ होत असते, एक सेल, दोन सेल्स, शंभर – हजार सेल्स, .... तेव्हा यामध्ये एक धागा असतो. त्याला नोटो कॉर्ड (NOTO Cord) म्हणतात. कर्मधर्म संयोगाने या नोटोकॉर्डवर बरेचसे काम डॉ. मुल्हेरकरांनी केलेले आहे. हा धागा नंतर पूर्ण अदृश्य होतो आणि त्याचा फक्त थोडासा तुकडा शरीरातील एकाच अवयवात राहतो. आणि तो अवयव म्हणजे मणक्यातील चकती. हे संशोधन जर पुढे सुरू ठेवले तर दहा–पंधरा वर्षांनी नक्कीच काहीतरी महत्त्वाचे सापडण्याची शक्यता आहे. पण दरम्यान आपण मणक्यातील चकती खराब होऊ नये म्हणून डॉ. मुल्हेरकरांच्या संशोधनाचा वापर करू शकतो आणि त्यामुळे पाठीचे दुखणे कमी करू शकतो.

''हे सर्व करत असताना २९ ऑगस्ट २०१९ रोजी आपल्याकडील "Foetal bovina seru" संपले. "Foetal bovina serum" म्हणजे



*श्री. कमलेश जोशी, मानपत्राचे वाचन करताना*

काय? या सिरममध्ये एक असा विलक्षण घटक असतो की ते घातल्याशिवाय कोणत्याही टिश्यू कल्चर लॅबमध्ये पेशी वाढविता येत नाहीत. आपल्याकडील सिरम संपल्यावर त्यांनी रातोरात या विषयावर संशोधन, वाचन करून, ते प्रत्यक्ष कृतीने आजमावून पाहून आपल्या ब्लडबँकेतील प्लेटलेट्स हे लिक्विड नायट्रोजन कॅनमध्ये घालून ठेवण्याचा प्रयोग यशस्वी केला आणि तेव्हापासून आम्ही ऑर्डर केलेले सिरमचे कॅन वापरण्याची गरज पडलेली नाही. मॅडम बोलताना असे म्हणाल्या की वर्षाला साधारण १०,००० लिटर सिरम आपण आयात करतो. त्याची किंमत लिटरला १ लाख रुपये आहे. आपल्या ब्लड बँकेतील प्लेटलेट्स जे पाच दिवसांनंतर वापरता येत नाहीत. त्यातील काही भाग प्रक्रिया करून आपण नष्ट करतो. म्हणजे त्यालाही खर्च येतो. या सर्व आयात रसायनांचा खर्च कमी व्हावा म्हणून एक बायरॅकचा प्रोजेक्ट मॅडमनी कालच स्वत: 'आयसर' (Indian Institute of Science Education and Research - IISRE) मध्ये जाऊन सादर केला आहे. पेट्रोलचा खर्च कमी व्हावा म्हणून त्यामध्ये जसे इथेनॉल मिसळतात तशा स्वरूपाचा हा प्रकल्प आहे. नेहमी त्या अॅसेसरच्या भूमिकेत असतात. काल त्यांनी प्रकल्प सादर करण्याची भूमिका घेतली. म्हणजे टेबलाच्या दोन्ही बाजूंचा अनुभव त्यांनी घेतला आहे आणि त्यामुळे देशाचाच फायदा होईल! 'आयसर'बरोबर संयुक्तपणे हा प्रोजेक्ट होणार आहे. तो मंजूर झाल्यास फारच उत्तम होईल.

दुसरे उदाहरण 'अॅन्टिबॉडीज'चे! आपल्या शरीरात 'आयजीएम' आणि 'आयजीजी' (Immunoglobulin M (IgM) and Immunoglobulin G (IgG) अशा 'अॅन्टिबॉडीज' असतात. वॅक्सिनेशन किंवा तपासणीसाठी हे सतत पाहिले जातात. व्हायरस नाकातून शरीरात प्रवेश करतो. नाकात "Secretaory IgA" अॅन्टिबॉडीज असतात. पण मोजायला सुलभ असल्यामुळे जगात सर्वत्र आयजीजी/आयजीएम 'अॅन्टिबॉडीज' मोजल्या जातात. पण डेरवण हे असे एकमेव स्थान आहे की जेथे मॅडमच्या चिकाटीमुळे फणसाच्या बियांत सापडणारे 'जॅकलीन' Jacalin) नावाचे द्रव्य वापरून "Secretaory IgA" वेगळे केले आहे. हे अतिशय क्लिष्ट काम असते. एका फ्रेंच डॉक्टरांशी संपर्क साधला असता त्यांनी एक मशिन घेण्याचे सुचवले. त्याची किंमत ३० लाखाच्या आसपास आहे. हा पदार्थ दुर्दैवाने आपणाला जर्मनीमधून मागवावा लागायचा. त्याची बाजारात ६०,००० रुपये किंमत आहे. पण या कार्याचे महत्त्व ओळखून श्री. अमित साळवींचे मित्र डॉ. ऋत्विक सावरकर यांनी 'मॅक्सप्लॅन्क लॅबोरेटरी'मध्ये मागणी नोंदवून ते आपणाला पाठवून दिले.

ते द्रव्य एका कॉलममध्ये भरायचे आणि वरून प्लेटलेट्स पास केल्यावर "Secretaory IgA" मिळते. येथे कॉलम वगैरे सर्व सोयी नसताना त्यांनी एका काचेच्या उपकरणात ते घालून हाताने चाळून ते वेगळे केले. ते पाहून मी "Secretaory IgA" मिळाले म्हणून खूश झालो. पण शास्त्रज्ञ असल्यामुळे त्यांनी मात्र चार ठिकाणी ते तपासून घेतले आणि मगच ते 'आयजीए' आहे हे मान्य केले.

डॉ. मुल्हेरकरांच्या कार्याला शुभेच्छा व्यक्त करून डॉ. नाडकर्णींनी आपले भाषण संपविल्यावर डॉ. श्रीपाद बाणावली यांनी आपले विचार मांडले. ते म्हणाले, "मी टाटा हॉस्पिटलमध्ये आणि डॉ. मुल्हेरकर काम करीत असलेल्या Advanced Centre for Treatment, Research and Education in Cancer मधील त्यांच्या आणि माझ्या सहकाऱ्यांशी बोलून त्यांच्याविषयी जाणून घेण्याचा प्रयत्न केला. सर्वांच्याच मनात त्यांच्याविषयी एक आदरयुक्त दरारा होता. मॅडमचा जन्म पाटण्यामध्ये झाला. बालपण कलकत्त्यामध्ये गेले. शिक्षणासाठी दोन भावांबरोबर त्यांना पुण्याला पाठविण्यात आले आणि पुण्याच्या नॅशनल मॉडेल स्कूलमध्ये त्यांनी प्रवेश घेतला. बी.एस्सी., एम.एस्सी. पुणे विद्यापीठातून झाले. पुण्याच्या बी.जे. मेडिकल कॉलेजमध्येही त्यांनी एक वर्ष संशोधन केले. त्यांनी पीएच.डी. कलकत्त्याहून केले. पुण्याशी त्यांचे नाते जुने आहे. जरी त्यांची कर्मभूमी मुंबई असली तरी आता त्या मुंबई आणि पुणे अशा दोन्ही ठिकाणी असतात. त्या एक 'अॅकम्प्लिश्ड' महिला आहेत. त्यांनी भरपूर काही साध्य केले आहे. बालपणात मिळणारे संस्कार फार महत्त्वाचे असतात. त्यांच्या मातोश्री उषा मुल्हेरकर या गृहिणी असताना त्यांनी जिद्दीने प्रशिक्षण पूर्ण करून भारतातील पहिल्या काही महिला पायलटमध्ये आपले नाव समाविष्ट केले. कलकत्त्यामध्ये 'बिर्ला एज्युकेशन इन्स्टिट्युट'च्या अनेक शाळा आणि संस्था आहेत. त्यांच्या त्या सेक्रेटरी झाल्या. मी त्यांना भेटलो होतो. अतिशय प्रभावी व्यक्तिमत्त्व. उत्तम वाचन होते. अनेक विषयांची माहिती त्यांना होती. त्यांच्या वडिलांच्या आत्या डॉ. लीला मुल्हेरकर या 'डिपार्टमेंट ऑफ सेल बायॉलॉजी अॅन्ड




*डॉ. मुल्हेरकर सत्काराला उत्तर देताना - ''येथील संशोधन कार्यात सहभागी होता आले हे मी माझे सौभाग्यच समजते.''*

टिश्यू कल्चर' च्या प्रोफेसर होत्या. त्या पुणे युनिव्हर्सिटीमध्ये 'हेड ऑफ दि डिपार्टमेंट' होत्या आणि त्यांच्या मार्गदर्शनाखाली मॅडमनी पीएच.डी. केली. त्यामुळे हे संस्कार लहानपणापासून आहेत आणि मॅडम त्याही पुढे गेल्या. मॅडमनी काय काय साध्य केले आहे हे सांगत बसलो तर सगळी संध्याकाळ त्यातच जाईल. पण सगळ्यात महत्त्वाचे सांगायचे तर त्यांच्या नावावर भारतातील पहिले 'ट्रान्सजेनिक माईस' तयार केल्याची नोंद आहे. 'ट्रान्सजेनिक माईस' म्हणजे थोडक्यात ढोबळपणे सांगायचे तर उंदिरांच्या जीन्समध्ये बदल करून प्रयोगशाळेत वेगवेगळ्या औषधांचा त्यांच्यावर प्रयोग करून पाहण्यासाठी ते वापरतात. मॅडमचा हातखंडा विषय म्हणजे 'जेनेटिक इंजिनीअरिंग' आणि त्यांनी त्याच्यामध्ये 'एन्हान्सिंग फॅक्टर' हा शोध लावला. त्यावर बरेचसे पेपर लिहिले गेले आहेत. त्यानंतर 'जीन थेरपी' म्हणजे बाहेरून जीन्स घालून ट्रिटमेन्ट करायची हा मोठा प्रोजेक्ट होता. तो बऱ्याच ठिकाणी पासही झाला. पण फंडिंग कमी पडल्यामुळे तो पूर्णत्त्वाला गेला नाही. तोंडाचे कॅन्सर्स ही थेरपी वापरून बरे करावेत असा हा प्रोजेक्ट होता. पाहू या! महाराजांची कृपा असेल तर डेरवणला हा प्रोजेक्ट यशस्वी होईल. 'जीन इंजिनीअरिंग' आणि 'जीन थेरपी' हा मॅडमचा विशेष प्राविण्याचा विषय.

जीन थेरपीमध्ये आणखी एक प्रोजेक्ट होता, त्यातही त्यांनी बरेच कार्य केले आहे. भारतातील महत्त्वाच्या सेल बायॉलॉजिस्ट म्हणून त्या प्रसिद्ध आहेत आणि सेल बायॉलॉजीत काम करणाऱ्या बहुतेक संस्थांच्या कमिटीवर त्या केव्हा ना केव्हा होत्या किंवा आहेत. तेथे त्यांनी बरेच काम केले आहे. त्यांचा अनुभव एवढा मोठा आहे की रिटायरमेंटनंतर कोणत्याही लॅब अगर फार्मास्युटिकल कंपनीने त्यांना आग्रहाने आपल्याकडे बोलावून घेतले असते. पण त्या पुण्याच्या डॉ. माधव देव यांच्या 'मुव्हिंग ॲकॅडमी ऑफ मेडिसिन ॲन्ड बायोमेडिसिन' या संस्थेत काम करू लागल्या. या संस्थेचे वैशिष्ट्य असे की ही संस्था आपली प्रयोगशाळा घेऊन जेथे मुलांना शास्त्रीय संशोधनाची संधीच मिळत नाही अशा ग्रामीण भागात, आदिवासी भागात शाळांमध्ये जाऊन तेथील मुलांमध्ये संशोधनाची आवड निर्माण करते. त्यामुळे अशा भागातील बरेच विद्यार्थी मेडिकल कॉलेजीस, लॅब्समध्ये शिक्षण घेऊ लागले आहेत.

त्यांना बरीच पारितोषिके मिळाली आहेत. 'इंडियन इन्स्टिट्युट ऑफ सेल बायॉलॉजी' नावाची जी संस्था आहे, त्या संस्थेतील त्यांच्या विद्यार्थ्यांच्या वतीने 'डॉ. ऋता मुल्हेरकर लेक्चर ॲवॉर्ड' दरवर्षी दिले जाते. त्यांच्या हाताखाली काम केलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्याविषयी किती आदर वाटतो याचे हे दर्शक आहे. ही गोष्ट सोपी नाही.

आमचे टाटा हॉस्पिटल आणि मॅडमची ACTREC ही संस्था यामध्ये आता जवळजवळ ३४ कि.मी.चे अंतर आहे. मी पूर्वी विद्यार्थी होतो तेव्हा ती संस्था हॉस्पिटलच्या शेजारी असल्यामुळे



*सत्कार मूर्तींचे स्वागत*

वारंवार त्यांच्या लॅबमध्ये जाऊन बऱ्याच जणांशी चर्चा करीत होतो. पण ही संस्था खारघरला गेल्यापासून तेथे जाणेयेणे कठीण होऊ लागले. पण माझे 'मेट्रोनॉमिक थेरपी'वरचे भाषण एकदा त्यांनी ऐकले तेव्हा त्यांनी स्वत: येऊन मला सांगितले की आपण यावर रिसर्च करू या, आणि त्यांनी मला फार मदत केली. त्यांच्या संस्थेत वेगवेगळी माणसे वेगवेगळ्या लॅब्जमध्ये, वेगवेगळ्या आस्पेक्टवर काम करीत असतात. त्या सगळ्यांना एकत्र करून आम्ही प्रोजेक्ट केला, तो सबमिटही केला. त्याला फंडिंग मिळाले नाही पण वर्षभर आम्ही एकत्र काम केले त्यामुळे मॅडमची माणसांना संघटित करण्याची कला आहे, शक्ती आहे त्याचा मला अनुभव आला. त्यामुळे 'सॅक' स्थापन करतांना महाराजांच्या कृपेने पहिले नाव माझ्या डोक्यात आले ते त्यांचे आणि ते त्यांच्या गुणांमुळे!

त्यांनी आपणाला बरीच मदत, बरेच मार्गदर्शन केले आहे आणि भविष्यातही त्या करीत राहतील. ACTREC मध्ये सपोर्ट न मिळाल्यामुळे राहिलेले कामही त्या आता येथे करू शकतील यासाठी आपण श्रीमहाराजांच्या कृपेने प्रयत्न करू.''

श्री. कमलेश जोशी यांनी इंग्रजीमध्ये मानपत्राचे वाचन केले आणि त्याचा अनुवाद डॉ. सुवर्णा पाटील यांनी वाचून दाखविल्यावर मंगल वाद्यांच्या सुरेल पार्श्वभूमीवर श्री. विकासराव वालावलकर यांच्या हस्ते डॉ. मुल्हेरकर यांचा सत्कार करण्यात आला.

यानंतर सत्काराला उत्तर देण्यासाठी डॉ. मुल्हेरकर उभा राहिल्या. ''हा सबंध कार्यक्रम पाहून मी भारावून गेले आहे. काय बोलायचे तेच समजत नाही!'' अशी सुरुवात करून श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टने त्यांचे प्रेरणास्थान असलेल्या सद्गुरू श्रीबाबामहाराज सहस्रबुद्धे यांच्या जयंती उत्सवात आपला सत्कार केल्याबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. त्या म्हणाल्या, ''गेली ३५ वर्षे मी टाटा मेमोरिअल सेंटरमध्ये कॅन्सर रिसर्च सेंटरमध्ये कर्करोगावर काम केले. त्यातील १२ वर्षे मला डॉ. माधव देव, तेव्हाचे डायरेक्टर, यांच्याबरोबर काम करण्याची संधी मिळाली. त्या वेळी त्यांनी बरेच नवीन प्रोग्रॅम सुरू केले, ज्याच्यावर आपल्याकडे कोणीच काम करीत नव्हते. जीन थेरपी नाव आपण ऐकले आहे, त्यावर त्यांनी प्रोग्रॅम सुरू केला आणि त्याच्यावर आता २५ वर्षांनी आपल्याकडे काम सुरू झाले आहे. अशी त्यांची फोरसाईट होती. ते व्हिजनरी होते. त्यांच्याबरोबर मला काम करायला मिळाले हे माझे सौभाग्य होते. आपण ट्रान्सजेनिक टेक्नॉलॉजीबद्दल ऐकलेत. ती टेक्नॉलॉजीही त्यांनी ACTREC मध्ये प्रथम सुरू केली. ते काम करण्यासाठी त्यांनी मला नेमले आणि मी ट्रान्सजेनिक ॲनिमल करू शकले. आणि आजपर्यंत ते काम करीत आहेत. त्यानंतर ७४-७६ मध्ये मी सर्विकल कॅन्सर आणि ओरल कॅन्सरवर जेनेटिकमध्ये काम करायला सुरुवात केली. आणि त्यानंतर डॉ. देव यांनी मुव्हिंग ॲकॅडमी ऑफ मेडिसिन

ॲन्ड बायोमेडिसिन'ची २००१ मध्ये सुरुवात केली. आम्ही त्याला MAMB म्हणतो. तर त्याचा उद्देश होता की मेडिकल स्टुडंट्सना मॉलिक्युलर बायॉलॉजी किंवा मॉलिक्युलर मेडिसिनचा परिचय करून देणे आणि त्याखेरीज त्यांच्यासाठी आम्ही कॉलेजीसमध्ये जाऊन लेक्चर्स द्यायचो आणि हॅन्ड्स ऑन ट्रेनिंगही द्यायचो. डॉ. देव आणि त्यांची टीम आपली उपकरणे बरोबर घेऊन जायचे आणि तेथे मुलांना वापरायला द्यायचे.

त्याखेरीज डॉ. देवांनी आणखी एक उपक्रम सुरू केला होता; त्याचे नाव होते 'डिस्कव्हरिंग लिटिल सायंटिस्ट्स'. पुण्याजवळील खेड्यापाड्यातील हुशार मुलांना विज्ञानाची खरी ओळख करून देण्याचे काम MAMB ने केले आहे आणि त्यातील बरीचशी मुले आता उच्च शिक्षण घेत आहेत. आदिवासी मुलांमध्ये शास्त्र विषयाची आवड निर्माण व्हावी म्हणून त्यांच्या शाळांमध्ये जाऊन त्यांना शिकविण्याचा कार्यक्रम त्यांनी हाती घेतला होता. २०१८ पासून ऑनररी डायरेक्टर म्हणून ते काम मी सांभाळू लागले. २०१४ मध्ये मी जेव्हा ACTREC मधून रिटायर झाले तेव्हा डॉ. बाणावली यांनी मला वालावलकर मेडिकल कॉलेजच्या सायंटिफिक ॲडव्हायझरी कमिटीमधे काम करण्याचे निमंत्रण दिले. डॉ. काकोडकर, डॉ. रामसामी अशांबरोबर काम करायला मिळणे हा माझा सन्मानच होता. पण त्याहीपेक्षा या कमिटीत आल्यामुळे मला श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टने केलेल्या उत्तम कामाची माहिती मिळाली. येथील सेवाभावी डॉक्टर लोकांशी परिचय झाला आणि विशेष म्हणजे त्यांच्या संशोधन कार्यात सहभागी होता आले हे मी माझे सौभाग्यच समजते. येथे मला डॉ. सुवर्णा पाटील यांच्याकडून किशोरवयीन मुलींसाठी सुरू असलेल्या कार्यक्रमाची माहिती मिळाली. डॉ. नाडकर्णी आणि डॉ. कोहली यांनी संशोधन केलेल्या प्लेटलेट रीच फायब्रेनची (त्याला त्यांनी 'डेरवण प्लग' असे नाव दिले आहे.) माहिती मिळाली. डॉ. नाडकर्णी यांनी त्यांच्या स्लिप-डिस्क ऑपरेशनसंबंधी माहिती दिली. दोन मणक्यांमध्ये जी चकती असते, ती बाहेर येते आणि त्यामुळे पाठीचे दुखणे होते. ती चकती काढून टाकली तर पेशंटला थोडा आराम मिळतो. अशा या काढलेल्या गॅपमध्ये या ऑपरेशनमध्ये डेरवण प्लग घातला जातो. त्यामुळे पेशंटची रिकव्हरी लवकर होते असे त्यांना वाटते. डॉ. नाडकर्णींना असे वाटते की काढलेल्या चकतीमधील पेशी जर काढल्या आणि त्या बाहेर 'टिश्यू कल्चर'मध्ये वाढवल्या आणि डेरवण प्लगमध्ये घातल्या तर रिकव्हरी लवकर होईल आणि पेशंटला दीर्घ काळ फायदा होईल. हे काम त्यांनी National Centre for Cell Science मध्ये डॉ. वाणी यांच्या मदतीने पार पाडले. आणि त्यांना पुढे हे संशोधन डेरवण हॉस्पिटलमध्ये करायचे होते. त्यांना ५० लाखांचे अनुदान बायरॅक (The Biotechnology Industry Research Assistance Commission, Government of India) कडून मिळाले. त्याच दरम्याने मीही या कामात सहभागी झाले. आणि आम्ही वालावलकर हॉस्पिटलमध्ये 'टिश्यू कल्चर लॅब' बनविली. त्याच्यामध्ये महाजनसाहेब, पाटीलसाहेब यांनी फार मदत केली. त्यामुळे लवकरात लवकर ती लॅब सुरू करता आली.

डॉ. नाडकर्णी ऑपरेशनच्या वेळी काढलेल्या पेशी आमच्याकडे पाठवायचे आणि आम्ही त्या 'टिश्यू कल्चर लॅब'मध्ये वाढवायचो. जगभरात या पेशी वाढविण्यासाठी "Foetal bovina serum" चा वापर केला जातो. हे सिरम गाईंच्या गर्भातून रक्त काढून तयार केले जाते. आणि हे आपण परदेशातून मागवतो. जगभर वार्षिक पाच लाख लिटर तर आपल्या देशात त्यापैकी दहा हजार लिटर सीरमचा वापर होतो. जेव्हा आमच्याकडील सीरम संपत आले, आणि आमचे टिश्यू कल्चरचे काम तर सुरू होते. ते काम आता बंद करायचे की काय असा आमच्यापुढे प्रश्न होता. तेव्हा डॉ. नाडकर्णींनी सुचविले की आपण "Platelet Lysate" चा वापर करून पाहू या. आम्हाला माहीत होते की "Platelet Lysate" मध्ये पेशींची वाढ होऊ शकते. प्लेटलेट्स ब्लडबँकेमध्ये मिळू शकतात. डेंग्यू, मलेरिया, कोविड अशा आजारात प्लेटलेट्स देतात हे आपल्याला माहीत आहेच. पण या प्लेटलेट्स रक्त काढल्यापासून ५ ते ७ दिवसातच वापराव्या लागतात. अशा 'एक्सपायर्ड' प्लेटलेट्समधून आम्ही "Platelet Lysate" तयार केले आणि या पेशींची वाढ होते की नाही हे पाहायला त्यात पेशी घातल्या. त्यात त्यांची वाढ व्यवस्थितपणे होत असल्याचे लक्षात आल्यावर मग आम्ही त्याचाच वापर सुरू केला. आयात केलेले "Foetal bovina serum" आता आम्हाला वापरावे लागत नाही. ते तसेच पडून आहे. पण आम्हाला हे शास्त्रीय पद्धतीने सिद्ध करावे लागणार होते की "Platelet Lysate" मध्ये पेशी व्यवस्थित वाढतात आणि या पेशी आणि "Foetal bovina serum" मध्ये वाढविलेल्या पेशी यामध्ये कसलाही फरक नाही. यासाठी डेरवणला काढलेल्या पेशी त्या खराब रस्त्यावरून सावधपणे पुण्याला आमच्या 'मुव्हिंग अकॅडमी'त नेल्या. तेथे त्या वाढवून त्याचे कॅरॅक्टरायझेशनचे काम आम्ही पूर्ण केले. आणि त्यामध्ये कोणताही फरक नाही हे सिद्ध केले. म्हणजे आता "Foetal bovina serum" ची गरज नाही.आपण त्या "Platelet Lysate" मध्येच वाढवू शकतो.

यातून दोन गोष्टी समजल्या. आपण पेशंटच्या चकतीतून काढलेल्या पेशी पेशंटच्या रक्तातील "Platelet Lysate" मध्येच वाढवू शकतो आणि त्या पेशी पेशंटच्या मणक्यात रिप्लान्ट करू शकतो. जनावराच्या रक्तातून काढून तयार केलेल्या "Foetal bovina serum" मुळे रिॲक्शन येऊ शकते. पण पेशंटच्या रक्तातून काढलेल्या प्लेटलेट्स वापरून वाढविलेल्या पेशींमुळे पेशंटला

रिॲक्शन येण्याची शक्यता फारशी नसतेच. आता फिजिकल ट्रायलसाठी तयारी सुरू आहे. कोणतीही नवी उपचार पद्धती वापरताना वेगवेगळ्या सरकारी परवानग्या आवश्यक असतात. त्या मिळवाव्या लागतील. शिवाय आत्ताच्या टिश्यू कल्चर लॅबमध्ये सरकारी निकषांनुसार काही आवश्यक ते बदल करावे लागतील. ते काम आता सुरू आहे. हा प्रोजेक्ट जर यशस्वी झाला तर तो अशा प्रकारचा पहिला प्रोजेक्ट ठरेल!

दुसरा महत्त्वाचा प्रोजेक्ट म्हणजे "Platelet Lysate" स्टॅन्डर्डाईझ कंडिशनमध्ये मोठा प्रमाणावर करायचे आहे. म्हणजे वेगवेगळ्या बॅचेसमधले "Platelet Lysate" तयार करून यातील गुणधर्म सगळे सारखे आहेत हे दाखवायचे! कालच तो प्रोजेक्ट सादर केलेला आहे.

दुसरे असे की आपल्या शरीरातील बऱ्याच अवयवातील पेशी टिश्यू कल्चरमध्ये वाढवाव्या लागतात. त्याचप्रमाणे अन्य पशूंच्या पेशीही वाढवाव्या लागतात. सगळीकडे "Foetal bovina serum" चा वापर होतो. त्या "Platelet Lysate" मध्ये वाढविता येतील का यावर संशोधन करावे लागेल. ते चार-पाच मोठ्या लॅब्जमध्ये तपासून घ्यावे लागेल आणि हा प्रयोग यशस्वी झाल्यास त्यांच्याकडून तसे प्रमाणपत्र घेऊ की "Platelet Lysate" वापरल्यास "Foetal bovina serum" वापरण्याची गरजच पडणार नाही. मग आम्ही ते छोट्याछोट्या लॅब्ज, युनिव्हर्सिटीजना उपलब्ध करून देऊ आणि "Foetal bovina serum" वापरू नका म्हणून त्यांचे प्रबोधन करू. याने परकीय चलन तर वाचेलच, पण यामध्ये या गाईंच्या वासरांचाही बचाव होईल. या मध्ये डॉ. रोहित आणि डॉ.सिमरन यांचा सहभाग असणार आहे.

आम्ही आणखी एक प्रोजेक्ट सुरू केला आहे. आता कोविडच्या काळात 'ॲंटिबॉडीज', आयजीजी, आयजीएम हे शब्द कानावर पडले असतीलच. यात रक्तात जास्तकरून दोन 'ॲंटिबॉडीज' असतात- आयजीजी, आयजीएम. पण आणखी एक ॲंटिबॉडी असते 'आयजीए' ("Secretaory IgA") जी जास्त करून नाकात, घशात असते. तर त्याच्यावर काम करायचे आम्ही ठरवले. आधी मला वाटले की हे काम आपल्याकडून होईल की नाही! पण डॉ. नाडकर्णी तर फारच आग्रही होते. त्यांना दुसरे काही सुचतच नव्हते. तर ते 'आयजीए' तयार करायचे आम्ही ठरवले. आईच्या दुधात या 'आयजीए'चे प्रमाण जास्त असते कारण त्याने बाळाला रोगप्रतिकारक शक्ती मिळते. आम्ही आईच्या दुधातून 'आयजीए' तयार करायचा विचार केला. यासाठी लागणाऱ्या बऱ्याचशा गोष्टी लवकरात लवकर कशा मिळवायच्या याच्या विचारात आम्ही होतो. पण आपले हितचिंतक साऱ्या जगभर आहेत आणि नाडकर्णींचे कॉन्टॅक्ट्स जगभर आहेत. त्यांच्या सांगण्यावरून डॉ. ऋत्विक सावरकर यांनी जर्मनीहून Jacalin Agarose Gel नावाचा एक पदार्थ आम्हाला पाठविला. त्याची ५ मि.लि.ची किंमत साधारण ६०,०००रु. असेल! पण त्यामुळे आम्हाला हे काम सुरू करता आले. आम्हाला आणखी एक ॲन्टीबॉडी पाहिजे होती ती यु.के.हून स्वीडनला पाठविली गेली आणि तेथून डॉ. नाडकर्णींचे मित्र भारतात येणार होते त्यांच्याबरोबर ती आली आणि आमचे काम सुरू झाले. हे सगळे कोविडच्या दिवसात झाले. आणखी एक आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे, डॉ. नाडकर्णी हे गप्प बसणारे गृहस्थ नाहीत. त्यांनी शोधून काढले की आपल्याकडे 'जॅकलिन'वर (जे फणसाच्या बियांपासून बनवितात) कोण संशोधन करत आहे. हैदराबादला डॉ. मूर्ती नावाचे संशोधक ते बनवतात हे समजल्यावर नाडकर्णी यांनी त्यांना लिहिले आणि त्यांनी आम्हाला १० मि.ली. अगदी मोफत पाठवून दिले. त्याची ५ मिलीची किंमत ६०,०००/- रु. आहे. आता फणसाच्या बिया डॉ. नाडकर्णींच्या खिश्यात नेहमी असतात. कोणाकडे असतील तर त्यांनीही त्या त्यांच्याकडे पाठवाव्यात; कारण त्यांना येथे 'जॅकलिन' तयार करायचे आहे. मला असे वाटले होते की हे काम फार कठीण आहे, पण ते यात यशस्वी झाले आहेत.

डेरवणला असे हे विविध उपक्रम सुरू आहेत आणि निवृत्तीनंतर माझीही ही शास्त्रीय संशोधनात दुसरी इनिंग सुरू झाली आहे. मी श्रीकाकामहाराजांची आभारी आहे. डॉ. सुवर्णा, विकासराव यांचा पाठिंबा आम्हाला आहे म्हणून हे काम आम्ही करू शकतो आहे. हे काम करण्यात मला खूप आनंद मिळत आहे आणि हे काम करण्याची संधी मला मिळाली म्हणून मी स्वत:ला भाग्यवान समजते. पुन्हा एकदा सर्वांचे आभार मानते. धन्यवाद!''

डॉ. सुवर्णा पाटील यांनी आभारप्रदर्शन केल्यावर वरयाचनेने हा माहितीपूर्ण आणि अत्यंत अनौपचारिकतेने पार पडलेला सोहळा समाप्त झाला.

# श्रीबाबामहाराज सहस्रबुद्धे यांचा १३७ वा जयंती उत्सव

पुणे येथे श्रीबाबामहाराज सहस्रबुद्धे समाधिमंदिरात श्रीसद्गुरू वासुदेवानंतसरस्वती तथा श्रीबाबामहाराज सहस्रबुद्धे यांचा १३७ वा जयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा झाला. दि. २४ नोव्हेंबर ते १ डिसेंबर २०२० या कालावधीत अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते आणि त्याला भक्तगणांचा प्रतिसाद अत्यंत उत्साहपूर्ण होता. दि. २४ ते २८ नोव्हेंबर या काळात सकाळी ह.भ.प. चिंतामणी निमकर, ह.भ.प. वासुदेवबुवा बुरसे, ह.भ.प. अनिल बुचके, ह.भ.प. विकासबुवा दिग्रसकर, ह.भ.प. सौ. मानसी बडवे यांची कीर्तने आणि सायंकाळी सौ. हर्षदा जोशी आणि आचार्य पद्मनाभ व्यास यांची प्रवचने यांचे आयोजन करण्यात आले होते.

**रविवार, दि. २९ नोव्हेंबर २०२०; कार्तिक शु.१४, शक १९४२**

दि. २९ नोव्हें. रोजी सकाळी ध्वजपूजनाने उत्सवाच्या मुख्य कार्यक्रमाला सुरुवात झाली. सामुदायिक नामस्मरण, सामुदायिक उपासना, उपनिषद पठण, लघुरुद्राभिषेक, आचार्य पद्मनाभ व्यास यांचे प्रवचन, दुपारी ह.भ.प. श्रीकांत अभ्यंकर यांचे कीर्तन, महाप्रसाद आदी कार्यक्रमानंतर सायंकाळी पाठांतर स्पर्धा पारितोषिक आणि पाठशाळेच्या परीक्षांचे प्रमाणपत्र वितरण; तसेच विद्वज्जनांचा सत्कार यासाठी एका समारंभाचे आयोजन केलेले होते.

**पारितोषिक आणि प्रमाणपत्र वितरण तसेच विद्वज्जनांचा सत्कार समारंभ**

भक्तगणांच्या आणि पाठशाळेतील विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत झालेल्या या समारंभाचा प्रारंभ वे.मू. मंदार क्षीरसागर आणि वेदपाठशाळेतील विद्यार्थ्यांनी पठण केलेल्या ईशस्तवनाने झाला. अध्यक्षस्थानी वे.मू. वसंतराव फडकेगुरुजी यांना निमंत्रित केलेले होते. आपल्या प्रास्ताविक भाषणात सूत्र संचालक श्री. विवेक सरस्वते यांनी ‘पाठात अंतर म्हणजे मन ठेवून शब्दांची उपासना करणे म्हणजे पाठांतर!’ अशी व्याख्या सांगून पाठांतराचे महत्त्व, स्पर्धेचा इतिहास आदी विषयांचा ऊहापोह केला आणि अध्यक्षांचा परिचय करून दिला.

वे.मू. वसंतराव फडकेगुरुजी यांचा जन्म पुण्याचा. वे.मू. किंजवडेकरगुरुजी (पुणे), वे.मू. बाबा गुरू पटवर्धन (सांगवेद विद्यालय, वाराणसी), वे.मू. विठ्ठल दुर्गाराम बोरकर (पटवर्धन वेदशास्त्र विद्यालय, पुणे) या तपस्वी गुरुजनांजवळ त्यांनी वेदाध्ययन केले. १९८९ ते ९१ या काळात अहमदनगर येथे वेदांत विद्यापीठात त्यांनी अध्यापनाचे काम केले. वेदविद्येचे संवर्धन आणि अध्यापन करण्यासाठी त्यांनी १९९६ साली ३५ विद्यार्थ्यांसाठी ‘श्रीनृसिंहसरस्वती पाठशाळे’ची स्थापना आपल्या पुण्यातील घरात




*वे.मू. वसंतराव फडकेगुरुजी यांचा सत्कार करताना श्रीकाका*




*श्री. विकासराव वालावलकर आपले मनोगत व्यक्त करताना*

केली. त्यांनी वेद शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्याकरिता १९७० ते १९९० या काळात 'सद्गुरू सेवा समिती' नावाची संस्था सुरू करून अनेक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देऊन शिक्षणास प्रोत्साहित केले. सध्या आळंदी येथे स्वत:च्या वास्तूत सुरू असलेल्या या पाठशाळेतून आत्तापर्यंत २० घनपाठी, २५ क्रमांत आणि शंभरावर ऋग्वेद शाखेचे विद्यार्थी त्यांनी तयार केले. गुरुजींच्या विद्यार्थ्यांनी देशभरात विविध वेदशास्त्र सभांमधून आपला ठसा उमटविला आहे. गुरुजींच्या वेदपाठशाळेला २५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल, त्यांच्या २५ विद्यार्थ्यांनी ऋग्वेदाचे क्रमपारायण करून गुरुजींच्या कार्याला वंदन केले. २००१ साली गुरुजींनी सर्व यमनियमांचे काटेकोर पालन करून नर्मदापरिक्रमा केली. गत वर्षी, वाराणसी येथे वर्षभर राहून गुरुजींनी कठीण अशी 'गर्भवास साधना' पूर्ण केली आहे. सर्व जग करोनाच्या संकटाने भयभीत अवस्थेत जगत असताना, आपल्या आप्तस्वकीयांपासून दूर, परप्रांतात वयाच्या ऐंशीव्या वर्षी ही साधना पूर्ण करणाऱ्या गुरुजींची देव, वेद आणि धर्माचरण यावरील अचल निष्ठाच प्रत्ययाला येते. गुरुजींचा आपल्या संस्थेच्या वतीने २०११ साली गौरव करण्यात आला होता.

मा. अध्यक्षांनी पद ग्रहण केल्यावर संस्थेचे मुख्य विश्वस्त श्री. अशोकराव जोशी यांनी त्यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. श्री. स्वप्नील केंकरे यांनी पाठांतर स्पर्धेच्या निमित्ताने आपले विचार व्यक्त केले. प्रथम सर्व यशस्वी स्पर्धकांचे अभिनंदन करून त्यांनी पाठांतराविषयी आपल्या बालपणातील काही आठवणी सांगितल्या. पाठांतर म्हणजे घोकंपट्टी न करता; विषयाचे मर्म समजून घेऊन केलेले पाठांतर कधीही विस्मरणात जात नाही हा आपला अनुभव आहे आणि श्रीरामदासस्वामींच्या शिकवणीप्रमाणे रोज अभ्यास करावा, तो वेगवेगळ्या विषयांचा करावा आणि तो समजून घेऊन करावा हा विचार त्यांनी खास करून वेदपाठशाळेतील विद्यार्थ्यांकरिता मांडला.

संस्थेचे कार्यकारी विश्वस्त श्री. विकासराव वालावलकर यानंतर बोलताना म्हणाले, ''गेली साठ वर्षे ही स्पर्धा सुरू आहे. पूर्वी फक्त बाहेरील शाळांतून लौकीक शिक्षण घेणारे शालेय विद्यार्थी या स्पर्धेत भाग घेत असत. आता आपल्या वेदपाठशाळेत अध्ययन करणारे विद्यार्थीही यात भाग घेत आहेत. तरीही स्पर्धकांची संख्या काहीशी कमी झाली आहे आणि ते स्वाभाविक आहे. एखाद्या गोष्टीला,

भाषेला राजमान्यता, समाजमान्यता किंवा जगन्मान्यता मिळाली की लोक हिरिरीने तिचा स्वीकार करतात. संस्कृत भाषा ही सगळ्यात शास्त्रीय, ऐकायला सुमधूर, बोलायला सोपी; कारण कर्ता, कर्म, क्रियापद हे कोठेही आले तरी चालते. पण ही भाषा बोलणाऱ्या लोकांनी कधी कोणावर आक्रमण केले नाही, दुसऱ्याचा प्रदेश जिंकला नाही, त्यामुळे ही भाषा अन्य काही पाश्चात्य भाषांसारखी फैलावली नाही. त्यामुळे आपल्या देशातच ती भाषा शिकण्यासाठी कोणी उत्सुक नसणे स्वाभाविक आहे. परंतु त्यामुळे त्या भाषेचे महत्त्व कमी होत नाही. संस्कृत आणि तिच्यापासून निघालेल्या अन्य भाषा उच्चाराप्रमाणे लिहिता येतात. लिहिल्याप्रमाणे उच्चारता येतात. इतर भाषा शिकण्यासाठी स्पेलिंग्ज पाठ करावी लागतात वा हजारो चित्ररूप चिन्हे लक्षात ठेवावी लागतात. जे आपल्या पूर्वजांच्या लक्षात आले ते अन्य लोकांच्या का लक्षात आले नाही? संस्कृत भाषा भारतीयांना, विशेषत: हिंदूंना आलीच पाहिजे. यासाठीच ही स्पर्धा आपण दरवर्षी घेतो. पाठांतराचे फायदे काय हे आपण दरवर्षी ऐकतो आणि पाठांतर न करणाऱ्यांनाही आता ते पाठ झाले आहेत. पाठांतरामुळे स्मरणशक्ती वाढते, उच्चार आणि विचारही शुद्ध होतात. श्रीसहजानंदसरस्वतीमहाराज या स्पर्धांच्या वेळी उपदेशात्मक भाषण करीत असत. १९८४–८५ साली त्यांनी जो उपदेश केला आहे त्याचा सारांश मी सांगतो. महाराज म्हणाले,'हा उपक्रम आपण बरीच वर्षे करीत आहोत. पण दुर्दैवाने साहेबाची आंग्ल भाषा आपणाला सोडीत नाही. आपणाला कौतुक वाटेल की भारतात नव्हे तर आंग्ल देशात अशी एक शाळा आहे की जिच्यात आठ–दहा वर्षांची मुले संस्कृतात लिहितात, भाषण देतात. भारतापासून हजारो मैल दूर, भारतात जे होऊ शकत नाही ते कौतुकास्पद आणि अनुकरणीय असे तेथे घडत आहे. त्यांच्या देशात का होईना पण माझ्या संस्कृताला आधार मिळतो आहे. संस्कृत ही देववाणी आणि वेदवाणी आहे. ती समाजाचे भूषण ठरणारी आहे. चार–पाच शब्दात एखादे सूत्र मांडले तर ४०० वा ४००० पानात त्याचा आशय मांडता येणे हे त्या भाषेचे मोठे वैशिष्ट्य आहे. आपली मुलेबाळे सर्व आंग्लविद्याविभूषित असल्यामुळे व राजकरणात असणारे सर्व लोक 'संस्कृत हे नकोच!' अशी भूमिका घेत असल्याने; या गोष्टी जर तुम्हाला परतवून लावायच्या असतील किंवा या लोकांना तुमच्या पायाशी येऊन प्रार्थना करायला लावायची असेल की आमचे संस्कृतबद्दलचे मत हे चुकीचे आहे आणि आम्ही ते दुरुस्त करीत आहोत; तसेच ही माणसे समाजाचा विनाश करीत असतील आणि या विचारांचे समाजातून उच्चाटन करायचे असेल तर त्यासाठी पराकाष्ठा करणे हे आपले कर्तव्य आहे. आणि ते पार पाडावयाचे असेल तर आपल्याला पाठांतराची आणि तेही संस्कृत आणि संतवाङ्मयाच्या पाठांतराची गरज आहे. हा मूलभूत विचारांचा पाया आहे आणि




*'वेदकलानिधी' दुर्गादास अंबुलगेकर यांचा सत्कार*




*'शास्त्रकलानिधी' पंडितप्रवर मोहनजी शर्मा यांचा सत्कार*




*पंडितप्रवर मोहनजी शर्मा सत्काराला उत्तर देताना*

तो मुलांकडून कसून करून घ्यायचा आहे. मराठीतून संस्कृतकडे आणि संस्कृतमधून आर्ष वागण्याकडे वळा. आणि आर्ष वागण्यातून उच्चतम, अतुल्य, अनुपम्य अशा वेदवाङ्मयाकडे वळा. ते अखिल जगताचे मूळ आहे. समाजात दूषणीय आणि भूषणीय अशा दोन्ही गोष्टी करणारे लोक असतात.दूषणीय भाग टाकून देऊन अनुकरणीय आहे ते घ्यावे. आपण कामावर जातो त्यामुळे घरातील सगळे लोक कामाला लागतात त्याप्रमाणे येथे केले पाहिजे. काही वेळा सक्तीने तर काही वेळा लालूच दाखवून मुलांकडून पाठांतर करून घ्यावे. त्याने मुले आचार-विचार संपन्न होतील व त्याने त्यांची बौद्धिक पात्रता वाढेल. डेरवण परिसरात या स्पर्धा सुरू केल्यावर काही लोकांनी मला सांगितले की आमच्या घरातील अपशब्द, शिव्यांचा उच्चार आता थांबला आहे. केल्याने होत आहे रे, आधी केलेचि पाहिजे! विज्ञानातील सत्य गोष्टी आपल्या वेदांमध्येच आल्या आहेत. त्याचा तौलनिक अभ्यास करून आपल्याला वैचारिक परिवर्तन करायचे आहे. त्यासाठी या स्पर्धा आवश्यक आहेत. तुम्ही आणि आम्ही या शिशुवर्गाचे मायबाप आहोत. घरात आपण विडी ओढली तर त्यांना सिगरेट ओढावीशी वाटणार. याकरिता चांगले विचार आपल्या घरातच असावेत. आपल्या वृद्धपणी आपल्या मुलाने आपल्याला प्रेमाने वागवावे असे वाटत असेल तर आजच त्याला मौलिक विचारांची देणगी द्या. लहानपणी पाठांतर केल्याने आचार, विचार, उच्चार यामध्ये शुद्धता होईल. कोट्यवधी विचारसंपन्न माणसांमुळे समाज विचारसंपन्न होईल. चार्वाक काही म्हणत असला तरी देहावरील संस्कार आत्म्याबरोबर राहतात. आपली पुढची पिढी आचार-विचार संपन्न व्हायला हवी असेल तर आपण आपल्या पाल्याकडे लक्ष द्या. त्यासाठी आधी आपण आपले आचार-विचार सांभाळा. शुक्राचार्य मद्यसेवन करीत पण त्यांच्याजवळ मृताला उठविण्याचे सामर्थ्य होते. आपल्याकडे ते सामर्थ्य आहे का? मग केवळ वाईट गोष्टींचे अनुकरण करू नका. पाठांतराची कास धरा. आपल्या तारुण्यात आपण आचार-विचार संपन्न व्हाल, आपल्या पाल्याला तसे कराल आणि समाजाचा उद्धार कराल यासाठी हा उपक्रम आहे.

आज ना उद्या हा उपक्रम मोठा होईल. उद्या पाश्चात्यांना याचे कौतुक वाटेल आणि श्रीबीडकरमहाराज म्हणाले तसे त्यांनी कौतुक केल्यावर मग आपल्यालाही या उपक्रमाचे कौतुक वाटेल!' श्रीमहाराजांच्या विचारांना उद्‌धृत करून विकासरावांनी आपले भाषण संपविले.

यानंतर वे.मू. सिद्धांत जोशी यांनी सत्कारमूर्ती वे.मू. दुर्गादास आंबुलगेकरगुरुजी यांचा परिचय करून दिला. आंबुलगेकरगुरुजी यांनी वे.मू. दिनकर जोशीगुरुजी, सावरगाव; वे.मू. श्रीधरशास्त्रीगुरुजी, गोकर्ण आणि वसंतराव फडकेगुरुजी यांच्याकडे सदशग्रंथ, अथर्ववेद व ऋग्वेदशाखेचे अध्ययन केले असून सध्या ते पुणे येथे वास्तव्य करीत आहेत. त्यांनी आंध्रप्रदेश, पंजाब आदी ठिकाणी झालेल्या परीक्षांमध्ये उत्तम यश मिळवून स्वत:ला सिद्ध केले आहे. कर्नाटक, पंजाब, मध्यप्रदेश आदी ठिकाणी त्यांचा सत्कार होऊन त्यांना 'अथर्ववेदी' या उपाधीने गौरविण्यात आले आहे. पावस येथे झालेल्या वैदिक संमेलनात शृंगेरी पीठाचे शंकराचार्य श्रीविधुशेखरभारती महाराज यांनी त्यांना विशेष वैदिक सन्मानाने गौरविले आहे. अनेक वेद पारायणे, संहिता स्वाहाकार आणि वैदिक संमेलनात त्यांचा सहभाग असतो. २००५ सालापासून 'आबासाहेब पटवर्धन वेदशास्त्र विद्यालय', पुणे येथे ते अथर्ववेदाचे अध्यापन करतात.

मानपत्राचे वाचन झाल्यावर मा. अध्यक्षांच्या हस्ते सत्कारमूर्तींना 'वेदकलानिधी' हे बिरूद, शाल, श्रीफल, पुष्पगुच्छ, महावस्त्र आणि महादक्षिणा रु. एकावन्न हजार अर्पण करून त्यांचा सत्कार करण्यात आला. उत्तरादाखल केलेल्या आपल्या भाषणात आंबुलगेकरगुरुजी

म्हणाले, ''आई-वडील आणि वेदोनारायण गुरुजी यांच्या कृपाशीर्वादामुळे मला आज हा सन्मान मिळाला आहे. त्यामुळे माझी जबाबदारी वाढली आहे आणि तिला साजेसे वर्तन मी करीन. माझ्यात जे जे चांगले आहे त्याचे श्रेय आई-वडील, गुरुजनांना असून जे वाईट आहे ते माझे आहे.'' सत्काराबद्दल सर्वांचे आभार मानून त्यांनी आपले भाषण संपविले.

यानंतर दुसरे सत्कारमूर्ती पंडितप्रवर मोहनजी शर्मा यांचा परिचय करून देण्यात आला. पं. मोहनजींचा जन्म उज्जैनचा. बालपणापासून वेदाध्ययनाची आवड. त्यांचे शुक्ल यजुर्वेद माध्यंदिन शाखेचे अध्ययन गजानन अवचटगुरुजी यांच्याकडे झाले. त्यांनी वे.मू. सत्यनारायणशास्त्री यांच्याकडे व्याकरणशास्त्र व वे.मू. देवदत्त पाटीलगुरुजींकडे न्याय आणि मिमांसा यांचे अध्ययन केले. तिरुपती येथे व्याकरण या विषयात एम.ए. आणि डेक्कन कॉलेज, पुणे येथे 'व्याकरण शास्त्रेनिपातार्थविचार:' या विषयात पीएच.डी. केली. अनेक विद्वद्सभांमधून त्यांचे सत्कार झाले आहेत. व्याकरणरत्न, व्याकरणअभिज्ञ, व्याकरणरत्न आदी उपाधींनी ते विभूषित आहेत. गोवा येथे ते शास्त्रअध्यापनाचे कार्य करीत आहेत.

मा. अध्यक्षांच्या हस्ते त्यांचा सत्कार 'शास्त्रकलानिधी' हे बिरूद, शाल, श्रीफल, पुष्पगुच्छ, महावस्त्र आणि महादक्षिणा रु. एकावन्न हजार अर्पण करून करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना ते म्हणाले,

''मी जेव्हा येथे आलो आणि स्वामीजींचे दर्शन घेतले तेव्हा माझ्या मनात विचार आला, की माझ्या गुरुजनांनी तपश्चर्या आणि कष्ट करून मला विद्या प्रदान केली आहे ती उत्तरोत्तर वाढवणे आणि तिचे दान करणे हे माझे कर्तव्य आहे. त्यासाठी तपस्वी लोकांचे मार्गदर्शन घेणे आवश्यक आहे.'' आपल्या एका सहाध्यायाची एक कविता त्यांनी म्हणून दाखविली. ''पाठशाला का विधाता । आचरण करके पढाता ।। विप्रका आचार क्या- व्यवहार क्या- त्योहार क्या । सुस्त होता सूर्य भी पर चुस्त होती पाठशाला । याद आती पाठशाला ।।'' फडकेगुरुजी आळंदीला राहायचे आणि कधी प्रतिपदेला वगैरे घरी पुण्याला यायचे तेव्हा कधीही पाहिले तरी ते काहीतरी अनुष्ठान करीत असायचे. त्यामुळे आम्हालाही वाटायचे की आपणही असेच सतत अध्ययन करीत राहिले पाहिजे. त्यांच्यापासून सतत अध्ययनाची प्रेरणा आम्हाला मिळाली. आम्ही आज जे आहोत ते आमच्या वे.मू. सत्यनारायणशास्त्री, वे.मू. देवदत्त पाटीलगुरुजी अशा गुरुजनांमुळेच आहोत.''




कु. महेश शेट्ये पाठांतर स्पर्धेतील पारितोषिक स्वीकारताना




कु. स्पृहा चव्हाण पाठांतर स्पर्धेतील पारितोषिक स्वीकारताना

पंडितप्रवर मोहनजी शर्मा यांच्या सत्कारानंतर पाठांतर स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ सुरू झाला. ऋग्वेद, कृष्णयजुर्वेद, सामवेद, मनाचे श्लोक, श्रीमहाराजविरचित सद्गुरुस्तुतीपर विविध अष्टके यांच्या पाठांतराच्या या स्पर्धेत श्रीसद्गुरू वासुदेवानंतसरस्वती पाठशाळेसह अनेक विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. मंडळातर्फे देण्यात येणारा 'कै. लक्ष्मण विनायक सप्रेगुरुजी स्मृती पुरस्कार' रु.२५००/- स्मार्त ऋग्वेद संहिता परीक्षेत प्रथम श्रेणी, प्रथम क्रमांकप्राप्त वे.मू. अमर अरुण कुलकर्णी यांना तर संपूर्ण ऋग्वेद संहिता परीक्षेत प्रथम श्रेणीत प्रथम येणाऱ्याला दिला जाणारा श्री. विश्वनाथ मिराशी पुरस्कृत पुरस्कार (रु.२५००/-आणि मानपत्र) वे. मू. सिद्धान्त जोशी आणि वे.मू. मंदार क्षीरसागर यांना विभागून देण्यात आला. या समारंभानंतर संस्थेतर्फे प्रतिवर्षी एका वेदपाठशाळेला देण्यात येणारे रु. तीस हजाराचे अनुदान वे.मू. मोरवणेगुरुजी, कणकवली यांच्या वेदशाळेला मिळाल्याचे जाहीर करण्यात आले.

यानंतर अध्यक्षमहोदयांचे विचार त्यांनी लिखित स्वरूपात दिले होते ते वे.मू. मंदार फडकेगुरुजी यांनी वाचून दाखविले. ''पूजनीय काकांनी आज्ञा केली की पात्रा पात्रतेचा विचार करत बसावयाचे नाही. वेडें वाकडें गाईन । परि तुझाचि म्हणवीन ।। या उक्तीला धरून माझे दोन शब्द. सभेला अध्यक्ष कसा असावा याबद्दल संतमहात्मे यांनी विचार केला आहे पण त्याचा विचार आत्ता नको. गेली




*'कै. लक्ष्मण विनायक सप्रेगुरुजी स्मृती पुरस्कार' स्वीकारताना वे.मू. अमर अरुण कुलकर्णी*



*संपूर्ण ऋग्वेद संहिता परीक्षेत प्रथम श्रेणीत प्रथम वे.मू. सिद्धांत जोशी (विभागून)*

५०-६० वर्षे अव्याहत चाललेली पाठांतरस्पर्धा, वेदशास्त्रांच्या परीक्षा, त्यानंतर लगेचच निकाल व पारितोषिक वितरण समारंभ व विद्वत् पूजन-विद्वत् सत्कार गेली ५०-६० वर्षे त्याच दिमाखात, त्याच दराऱ्यात, त्याच चोखंदळपणाने चालविणे इतके सोपे नाही. त्याला गुरुनिष्ठा, श्रद्धा, भक्ती इत्यादी गुण लागतात. थोरल्या महाराजांनी पायंडा घालून दिला त्या बरहुकूम, नव्हे नव्हे, काकणभर जास्तीच जोमाने अत्यंत शिस्तीने हे पवित्र कार्य चाललेले आपण सर्व भक्त पाहात आहात. 'करू संती केले ते ।' असे पावलावर पाऊल ठेवत हे कार्य चाललेले आहे. संत तुकाराम महाराज म्हणतात, 'कांहीं पाठ केलीं संतांचीं उत्तरे । विश्वास आदरें करोनियां ।।' तसेच समर्थ रामदास स्वामी उपदेश करताना सांगतात की, 'प्रातःकाळीं उठावें । कांहीं पाठांतर करावें । येथानशक्ति आठवावें । सर्वोत्तमासी।' आधुनिक काळातील उदाहरण म्हणजे आपल्याकडील एक डॉक्टर चांगले प्रथितयश आहेत. त्यांचे निदान हे यंत्र सामुग्रीच्या निदानाच्या




*संपूर्ण ऋग्वेद संहिता परीक्षेत प्रथम श्रेणीत प्रथम वे.मू. मंदार क्षीरसागर (विभागून)*

अगोदर होते. ते ॲलोपॅथीचे डॉक्टर, पण परंपरेने घराण्यात आयुर्वेद पाणी भरत असतो. लहानपणी आयुर्वेद ग्रंथाचे पाठांतर केल्यामुळे रुग्ण तपासताना निदानाप्रमाणे त्यांना सुश्रुत चरक ग्रंथाचे अचूक उतारे आठवतात.

ही संतांची शिकवण आहे. आपण संतमहात्म्यांची उदाहरणे देतो पण हे सर्व संत कसे होते ते आपणाला त्या वाङ्मयाचे गाढे अभ्यासक, प्रथितयश प्रवचनकार यांच्याकडून; आपणा सर्वांचे भाग्य म्हणून पूजनीय काकांच्यामुळे; पाहावयास, ऐकावयास मिळते. ह्या सर्व संत मंडळींनी वेदाबाहेरचे काहीच सांगितले नाही. त्यामुळे वेद, संत, महात्मे हे आपण वेगवेगळ्या दृष्टीने पाहातो पण ते सर्व एकच आहेत. थोरल्या महाराजांची जी दूरदृष्टी होती ती जोपासण्याचा हा खटाटोप.

विरुद्ध काळात म्हणजेच दूरदर्शन, भ्रमणध्वनी, संगणक इत्यादी साधनांचा सुळसुळाट असतानाही पाढे, परवचा, रामरक्षा, मारूतिस्तोत्र, भगवद्गीता, किंवा दोनच्या पाढ्यापासून औटकीपर्यंत उजळणी या सर्वांचा लोप होत असतानाही हे पवित्र कार्य श्रीमहाराजांनी व काकांनी सर्वसामान्यांना म्हणता येतील अशा स्तोत्रांच्या स्पर्धांचे आयोजन करून नेटाने आग्रहपूर्वक चालविले आहे.

विद्वत् सत्काराबद्दल काय बोलावे? या ठिकाणी विद्वत् सत्कार, विद्वत्पूजन हे कायमच, उत्तम शिस्तीने अव्याहत चालत आले आहे. आजचे सत्कारमूर्ती दुर्गादास यांना मी गमतीने 'द्विवेदी' म्हणतो. यांनी ऋग्वेदाचे अध्ययन करून अथर्ववेदावर प्रभुत्व मिळविले आहे व आचार-विचार पाळून आहेत व पारमार्थिक प्रगती करण्याकरिता पायी प्रवास, परिक्रमा इत्यादी करून अव्याहत यत्न सुरू आहेत. त्यांचे पुनः एकदा अभिनंदन!

दुसरे सत्कारमूर्ती व्याकरणरत्न मोहनजी शर्मा यांनी न्यायशास्त्र व व्याकरणशास्त्राचा सखोल अभ्यास केला आहे. त्यांनी फार अल्पवयाचा एक असा छात्र तयार केला आहे की त्याचे कौतुक




*वे.मू. मंदार फडकेगुरुजी अध्यक्षांचे मनोगत वाचून दाखविताना*




*श्रीसद्गुरू वासुदेवानंतसरस्वती सेवामंडळाचे अध्यक्ष*
*श्री. विनायकराव पराडकर – आभारप्रदर्शन*

या भारत देशाचे पहिले हिंदू पंतप्रधान असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही, असे श्री. नरेंद्र मोदी यांनी स्वतः ट्विटद्वारा केले होते. त्यांचेही पुन्हा अभिनंदन! या दोन्ही सत्कारमूर्तींची निवड दर वर्षीप्रमाणे उत्तमच आहे.

वेद विषयात अलीकडील २०–२५ वर्षाच्या काळात पुष्कळच स्पर्धा येथे होतात. त्या त्या विषयांचे पंडित निमंत्रित करून उत्तम पंडितांची निवड करून परीक्षा घेतल्या जातात व योग्यतेप्रमाणे छात्रांना पारितोषिके देण्यात येतात. आधुनिक शिक्षण पद्धतीत गेल्या वर्षातील पाठांतर या वर्षी नसले तर चालते! वेदांच्या अभ्यासात मात्र तसे नाही! पहिल्या इयत्तेपासून शेवटच्या इयत्तेपर्यंत अध्ययन जिवंत ठेवावे लागते. शिवाय पुढील संपूर्ण आयुष्यात ते तसेच पाठ ठेवावे लागते. या जन्मात पहिल्यापासून शेवटपर्यंत कष्ट कष्ट आणि कष्टच! भगवान कृष्ण सांगतात, 'ब्राह्मणस्यतुदेहोयं क्षुद्रकामायनेष्यते। कृछ्रायतपासेचैव प्रेत्यानंतसुखायच।।' सारांश, ब्राह्मणाच्या कुळात जन्म घेतला की इतर प्रलोभनीय इच्छा न ठेवता केवळ वेदांच्या अभ्यासाचे तप करून कायमस्वरूपी मिळणाऱ्या सुखाची इच्छा धरावी.




*वरयाचना*



लोक हो, मोठ्या संतांनी, महाराजांनी या सर्वाचा पाया उत्तमपैकी घातला आणि पुढील पिढीने तो शिखरावर नेला आहे. याही पाठशाळेतील वेदाध्ययन करणारे छात्र चांगले चमकू लागले आहेत ही महाराजांचीच कृपा आहे. आपण सगळे भाग्यवान आहोत. हे सर्व पाहण्याचे भाग्य आपणाला लाभत आहे. यानिमित्ताने मला तोडकामोडका संवाद आपणा सर्वांशी साधता आला याबद्दल मी कृतज्ञता व्यक्त करतो व माझे अध्यक्षीय दोन शब्द संपवितो. सर्वांना नमस्कार.''

यानंतर श्रीसद्गुरू वासुदेवानंतसरस्वती सेवामंडळाचे अध्यक्ष श्री. विनायकराव पराडकर यांनी आभारप्रदर्शन केल्यावर वरयाचनापठणाने या कार्यक्रमाची सांगता झाली. सायंकाळी त्रिपूरपूजन आणि तुलसी विवाह यथासांग करण्यात आला.





*जन्म सोहळा*




*प्रवचनकार आचार्य पद्मनाभ व्यास*

## सोमवार, दि. ३० नोव्हेंबर २०२०; कार्तिक पौर्णिमा, शक १९४२
## श्रीबाबामहाराज सहस्रबुद्धे जयंती दिन

श्रीबाबामहाराजांचा जयंती उत्सव श्रीमहाराजांनी प्रस्थापित केलेल्या परंपरेप्रमाणे अत्यंत भक्तिभावाने साजरा झाला. सकाळी भक्तगणांचे सामुदायिक नामस्मरण, सामुदायिक उपासना, उपनिषदपठण, लघुरुद्राभिषेक, आचार्य पद्मनाभ व्यास यांचे प्रवचन आदी कार्यक्रमानंतर श्रीबाबांच्या मंदिरात जन्मोत्सवाचे कीर्तन झाले. जन्मोत्सवाचा सोहळा अत्यंत भक्तिभावपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. त्यानंतर महाप्रसाद झाला. सायंकाळी 'श्रीं'ची रथातून समाधिमंदिराभोवती पालखीप्रदक्षिणा काढण्यात आली. भक्तगणांनी अत्यंत उत्साहाने नाचत, भजन करीत या सोहळ्यात भाग घेतला.

**भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र**
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : (०२३५५) २६४१४९ / २६४६३६ / २६४६३७ फॅक्स : (०२३५५) २६४१८१
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com

## मंगळवार, दि. १ डिसेंबर २०२०; कार्तिक वद्य १, शक १९४२

सकाळी भक्तगणांचे सामुदायिक नामस्मरण, सामुदायिक उपासना, उपनिषदपठण, लघुरुद्राभिषेक, आचार्य पद्मनाभ व्यास यांचे प्रवचन आदी कार्यक्रमानंतर, सायंकाळी डॉ. ऋता मुल्हेरकर यांचा सत्कारसोहळा झाला. त्यानंतर लळीताचे कीर्तन होऊन प्रसादवाटपानंतर उत्सवाची सांगता झाली.



*मंत्रजागर*

**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्री. विकासराव वालावलकर यांनी मुद्रा, ३८३, नारायण पेठ, पुणे-३० येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण, जि. रत्नागिरी येथून प्रकाशित केले. । Visit us at https://swamisamarth.com/dervan/
**संपादिका :** डॉ. सौ. सुवर्णा पाटील-९९२१२ ५१६९५, **संपादक मंडळ :** सौ. शरयू यशवंतराव-९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर-९५८८४ ७९२२०